# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

प्रेसनोट क्रमांक २७३/२०२४ दिनांक:- २६/०७/२०२४.

## “पुरुष वेश्यादलालास ताब्यात घेवुन दोन पिडित मुलींची सुटका करण्यास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकास यश”

दिनांक २४/०७/२०२४ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांना बातमीदारकडून इसम नामे दिनेश हा वेश्याव्यवसाय करीत असुन त्याचे मोबाईल क्रमांकावर पुरुष गिऱ्हाईकाने संपर्क साधला की, तो व्हाटसॲपव्दारे पुरुष गिऱ्हाईकांना मुलींचे फोटो पाठवुन, पैशाच्य मोबदल्यात वेश्यागमनासाठी मुली पुरवितो.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने कायदेशीर बाबींची पुर्तता करुन बोगस गिऱ्हाईक व दोन पंच बोलावुन वेश्यादलाल दिनेश परमार याने सांगितल्याप्रमाणे सुदामा व्हेज हॉटेल, क्रिष्णा पॅलेस, पी.व्हि.आर सिनेमा जवळ, कनकिया, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे या ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन १५.१६ वा. छापा टाकला असता, यातील वेश्यादलाल दिनेश मणिलाल परमार, वय-५६ वर्ष, सध्या रा. दहिसर पुर्व, मुंबई, मुळ रा. राज्य-गुजरात याने ०२ पिडीत महिलांना सोबत आणुन वेश्यागनमासाठी प्रवृत्त करुन वेश्यागमनाची रक्कम ठरवुन स्वत:च्या उपजिवीकेकरीता रक्कम स्वत: वेश्यादलाल दिनेश परमार याने स्वीकारल्याने त्यास सापळयातील रोख रक्कम व इतर मुद्देमालसह ताब्यात घेवुन ०२ पिडित मुलींची सुटका करण्यात आली आहे. सदर बाबत सफौ/शिवाजी पाटील यांनी वेश्यादलाल आरोपी नामे दिनेश परमार याचेविरुध्द सरकार तर्फे फिर्यादी दिल्याने मिरारोड पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. २३४/२०२४, भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १४३(३), सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४, ५ प्रमाणे दिनांक २४/०७/२०२४ रोजी गुन्हा दाखल आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि./समीर अहिरराव, सफौ/उमेश पाटील, शिवाजी पाटील, रामचंद्र पाटील, पोशि/केशव शिंदे, पोशि/चेतनसिंग राजपुत, चा.पोहवा/सम्राट गावडे, मपोशि/अश्विनी भिलारे, मपोशि/शितल जाधव व मसुब/अश्विनी वाघमारे, सर्व नेम.अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांनी केली आहे.